Page :
Date : / /

## प्रतिक्षा

आता जगणे अंगवळणी पडले...
जरी मी ठेचे झाकुनी चालतो...
टाकुनियाच वेडी वाकडी वळणे...
सन्मार्गावरी, सावरुनी चालतो.. ॥

शब्दा शब्दांचे अर्थ सहज जाणतो...
जर दिला शब्द कुणा तो पाळतो...
ऋतु ऋतुंच्या, जरी असे बेभरोसा...
कालचक्र भाळीचे, निमुट झेलतो -- ॥

जरी उद्ध्वस्त स्वप्ने सारी अंतरीची...
गुच्छ आशांचे मी हळुवार गुंफीतो...
हृदयांतरी सुगंधाच्याच अत्तर कुपी...
माझ्याच भाव गीतातुनी मी डुंगतो -- ॥

लोचनी सांजळलेली तिन्हीसांजा...
त्या सोज्वळ निरांजनी मी न्हातो...
अंतरात नित्य प्रतिक्षा आकांक्षांची...
बाहु पसरुनी मुक्तीची वाट पाहतो -- ॥



रवी. ग. सातपुते (भावकवी)